NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय – शिवाजी विद्यापीठाचे अधिकृत युट्यूब चॅनल कार्यान्वित झाले बाबत...**

शिवाजी विद्यापीठाचे अधिकृत युट्यूब चॅनल कार्यान्वित झाले असून सदर चॅनलसाठी 'शिव वार्ता' (Shiv Varta) हे नांव, तसेच https://www.youtube.com/c/shivvarta असा कस्टमाईज्ड पत्ताही (URL) प्राप्त झाला आहे.

- सर्व अधिविभाग, विभाग, महाविद्यालये, अधिविभाग प्रमुख, प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांनी सदर चॅनलला सबस्क्राईब, लाईक, फॉलो करावे व नोटिफिकेशन बेल आयकॉनला क्लिक करावे.
- विद्यापीठातील अधिविभाग आणि विभागांसाठी सदर चॅनलमध्ये आपले कार्यक्रम प्रसारित करण्यासाठीची नियमावली खालीलप्रमाणे आहे.
- अधिविभागांत, विभागांत होणारे महत्त्वाचे कार्यक्रम, व्याख्याने, कार्यशाळा, परिषदा आदी उपक्रमांचे व्हिडिओ संबंधित अधिविभागांकडून संपादित स्वरूपात प्राप्त होण्यासाठी पुढील मूलभूत बाबींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

अ) सदर व्हिडिओ संबंधित अधिविभाग प्रमुखांच्या मान्यतेने सादर झालेले असावेत.

आ) सादर करण्यात आलेल्या व्हिडिओचे चित्रीकरण व ध्वनी यांचा दर्जा उत्तम असावा.

इ) संबंधित व्हिडिओसाठी समर्पक शीर्षक व त्याविषयीची थोडक्यात माहिती (Description) (जास्तीत जास्त १५०० शब्दांपर्यंत) मराठी व इंग्रजीतून देण्यात यावी. हिंदी अधिविभागाने हिंदीतूनही द्यावी. यामध्ये व्हिडिओमधील कन्टेन्टविषयी (वक्ते, व्याख्याते, सहभागी मान्यवर आदींसह) तसेच त्याचे स्थळ, चित्रीकरणाचा दिनांक व वेळ आदी माहितीचाही समावेश असावा.

ई) सदर चॅनलसाठी देण्यात येणाऱ्या व्हिडिओजमध्ये कोणत्याही प्रकारचा कॉपीराईट कन्टेन्ट (ध्वनी, चित्र, चित्रफीत, संगीत इत्यादी) असणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्याची जबाबदारी संबंधित अधिविभाग प्रमुखांची राहील.

उ) व्हिडिओमध्ये कॉपीराईटमुक्त आणि शक्यतो ओरिजनल कन्टेन्ट वापरावा. पार्श्वसंगीत वापरावयाचे असल्यास तेही कॉपीराईटमुक्त असावे. शक्यतो युट्यूबने उपलब्ध करून दिलेल्या मोफत व मुक्त संगीताचा/ आवाजांचा वापर करावा.

ऊ) विद्यापीठाचे हे अधिकृत चॅनल असल्याने राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय कॉपीराईट कायद्याचा कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही, याची तसेच युट्यूबच्या नियम व अटींचा भंग होणार नाही, याची दक्षता संबंधितांनी घेणे बंधनकारक राहील.

ऋ) सामाजिक सौहार्द, राष्ट्रीय एकात्मता व अखंडता तसेच संवैधानिक मूल्यांना बाधा पोहोचविणारा कन्टेन्ट, वक्तव्ये संबंधित व्हिडिओजमध्ये असणार नाहीत, याची दक्षता संबंधितांच्या स्तरावरच घेण्यात यावी.

ऌ) सदर चॅनलसाठी पाठविण्यात येणारे व्हिडिओ हे पूर्णतः शैक्षणिक स्वरुपाचे व विद्यापीठाची प्रतिष्ठा वृध्दिंगत करणारे असावेत.

- विद्यापीठात वेळोवेळी विविध विभागीय, आंतरविद्यापीठ, राष्ट्रीय स्पर्धा/ महोत्सव/ परिषदा आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. सदर उपक्रमांचे व्हिडिओ सदर चॅनलवर होस्ट करण्यासाठी तातडीने उपलब्ध करण्याची जबाबदारी आयोजकांवर राहील. आयोजकांनी सदर कार्यक्रमांचे रेकॉर्डिंग शक्य तितक्या तातडीने जनसंपर्क कक्षास उपलब्ध करून देण्याची दक्षता घ्यावी.

(डॉ.विलास द.नांदवडेकर)
**कुलसचिव**

जा.क्र.जनसंपर्क कक्ष/
दि. १८/११/२०२०

प्रति,

१. सर्व अधिविभाग, संचालक, समन्वयक, रेक्टर्स, प्रशासकीय विभागप्रमुख
२. सर्व मा.कुलगुरू, मा.कुलसचिव, मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा.वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३. इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.